**ब्रँडींग व मार्केटींग ही बाब राबविण्यासाठी आवश्यक माहिती खालीलप्रमाणे.**

राज्यातील असंघटीत क्षेत्रातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याकरिता अन्न प्रकिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) लागू केली आहे. सदर योजना सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षाच्या कालावधीत एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) या आधारावर राबविणेसाठी केंद्र शासनाकडून दि. २९ जुलै, २०२० रोजी मान्यता दिलेली असुन, राज्य शासनाकडून दि. २३ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना राबविणेबाबत मान्यता प्राप्त झालेली आहे. याअनुषंगाने सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये सहभागी शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व सहकारी उत्पादक किंवा एस.पी.व्ही. यांना या योजने अंतर्गत बँन्डीग व मार्केटिंग यासाठी सहाय्य केले जाईल. तसेच एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनासाठीच विभागीय किंवा राज्यस्तरावर ब्रँडींग व विपणनासाठी सहाय्य केले जाईल.

**सहाय्यासाठीच्या पात्र बाबी :**

अ) योजनेअंतर्गत विपणनाशी संबंधित प्रशिक्षणासाठी संपूर्ण निधी उपलब्ध केला जाईल.

आ) सामाईक ब्रँड व पॅकेजिंग विकसित करणे.

इ) राष्ट्रीय व विभागीय स्तरावरील किरकोळ विक्री साखळी व राज्यस्तरीय संस्थांशी विपणन करार.

ई) उत्पादनाचा अपेक्षित दर्जा राखला जावा याद्दष्टीने गुणवत्ता नियंत्रण.

ब्रँडींग व विपणाच्या दृष्टीने सहाय्य करण्यासाठी उत्पादनाचे सामाईक ब्रँड व सामाईक पॅकेजिंग निर्माण करणे व उत्पादनाचे प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. तसेच सामाईक पॅकेजींगच्या सहभागासाठी प्रमाणीकरण करणे. सामाईक ब्रँडींग व पॅकेजिंगसाठीची साजेशी गुणवत्ता / स्तर ही ठिकाण, उपक्रम व उत्पादन परत्वे वेगवेगळी असू शकते. हा स्तर जिल्हा, विभाग किंवा राज्यस्तर असावा याचा निर्णय राज्य नोडल एजन्सी घेईल. तसेच ब्रँडींग व पॅकेजिंगसाठी एकूण खर्चाच्या ५०% रक्कम सहाय्य म्हणून देय राहिल. यासाठीची कमाल निधी मर्यादा विहीत करण्यात येईल. या योजनेअंतर्गत किरकोळ विक्री केंद्रे सुरु करण्यासाठी सहाय्य दिले जाणार नाही.

राष्ट्रीय स्तरावर देखील मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या उत्पादनासाठी ब्रँडींग व पॅकेजिंगसाठी वर उल्लेख केल्यानुसार एक जिल्हा एक उत्पादन धोरणाच्या धर्तीवर सहाय्य केले जाईल. अशा प्रकारच्या सामाईक ब्रँडींग, पॅकेजिंगसाठीचे आणि विपणनासाठीचे सहाय्य राष्ट्रीय स्तरावर दिले जाईल.

**पात्रता व निकष:**

प्रस्ताव सादर करीत असतांना खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे :

अ) प्रस्ताव एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनाशी संबधित असावा.

आ) उत्पादन सहाय्यासाठी पात्र होण्याकरिता अशा उत्पादनाची आर्थिक उलाढाल किमान रु. ५ कोटी असावी.

इ) अंतीम उत्पादन जे ग्राहकाला किरकोळ पॅकिंगच्या स्वरुपात विक्रीसाठी उपलब्ध असेल.

ई) अर्जदार शेतकरी उत्पादक संस्था / स्वयंसहाय्यता गट/ सहकारी उत्पादक विभागीय किंवा राज्यस्तरीय एस.पी.व्ही. असेल जी मोठ्या प्रमाणात उत्पादक शेतकऱ्यांना एकत्र आणेल.

उ) उत्पादन व उत्पादक यांचा विस्तार व वाढ मोठया स्तरावर करणे शक्य होणार आहे.

ऊ) जी संस्था उद्योग उभारणी करणार आहे तिची व्यवस्थापन व उद्योजकीय क्षमता याबाबतचा तपशील प्रस्तावामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

**ब्रँडींग व विपणन सहाय्यासाठी अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती :**

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे:

अ) सादर करावयाच्या प्रस्तावाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करीत असतांना त्यामध्ये आवश्यक तपशील जसे की प्रकल्पाचा तपशील, उत्पादन, कार्यपध्दती, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादनाचे एकत्रीकरण, सामाईक ब्रँडींग व पॅकेजिंग, किंमत निश्चिती कार्यपध्दती, उत्पादनाची प्रसिध्दी, गोदाम व साठवणूक, विपणन व्यवस्था (चॅनेल), विक्री वाढविण्यासाठीचे नियोजन इ. चा समावेश असावा.

आ) ब्रँडींग व विपणन प्रस्तावासाठीचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सदरचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे मान्यता घेणेस पाठविण्यात येतील. त्यामध्ये ज्या सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता मिळेल अशा प्रस्तावांनाच राज्य नोडल एजन्सी मार्फत रक्कम रु.५ लाखाचे सहाय्य उपलब्ध असेल.

इ) सदर प्रस्तावामध्ये कच्च्या मालाची खरेदी ते विक्री पर्यंत टप्प्याटप्याने हाती घ्यावयाच्या उपक्रमांचा तपशील, महत्वाच्या नियंत्रणाच्या बाबी, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादनाच्या जाहिरात व प्रचार-प्रसिध्दी संबंधीत पुढील पाच वर्षांत राबवावयाचे उपक्रम, सहभागी होणाऱ्या उत्पादकांची संख्या व आर्थिक उलाढाल वाढवणे हा तपशील असावा.

प्रस्तावाच्या अंमलबजावणी संदर्भात एक करार केला जाईल ज्यासोबत व्यवसाय आराखडा जोडलेला असेल. सदरचा करार हा शेतकरी उत्पादक संस्था / स्वयंसहाय्यता गट / सहकारी उत्पादक / एस.पी.व्ही व प्रमुख खरेदीदार (असल्यास) व राज्यस्तरीय नोडल एजन्सी यांच्यामध्ये असेल. करारामध्ये उत्पादकांच्या भांडवल व सेवांच्या गरजा व त्यांच्या उत्पादनाची क्षमता आणि कौशल्य सुधार करण्यासाठी प्रस्तावित सुधारणा व बदल तसेच उत्पादकांची प्रमुख खरेदीदारांसोबत बाजार जोडणी अधिक बळकट कशाप्रकारे केली जाईल याचा तपशील असावा.

प्रस्ताव सादर करताना संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / विभागीय कृषि सहसंचालक यांचेकडे पाठविण्यात यावेत व त्याची एक आगाउ प्रत राज्य नोडल एजन्सीकडे माहितीसाठी पाठविण्यात यावी. सदरचे प्रस्ताव जिल्हास्तरीय समिती मार्फत राज्य नोडल एजन्सीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येतील. राज्य नोडल एजन्सीकडून प्रस्ताव छाननी करून राज्य कार्यकारी समितीमार्फत राज्यस्तरीय मंजूरी समिती (SLAC) ला पाठविले जातील. तद्नंतर राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या (SLAC) शिफारसीने सदरचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविले जातील.

ब्रँडींग व मार्केटींगचे प्रस्ताव वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३ महिन्याच्या आत सादर करावयाचे आहेत.

***नोट** :- केंद्र शासनाकडून मार्केटींग व ब्रँडींग या घटकाच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना अदयाप प्राप्त नाहीत. यास्तव केंद्र शासनाच्या पी.एम.एफ.एम.ई या योजनेच्या कृषि विभागाच्या संकेतस्थळावरील इंग्रजीमधील मार्गदर्शक सुचना या सदयस्थितीत अंतीम समजण्यात याव्यात.*